सकाळ

# एनएसएस श्रमसंस्कार शिबिर वाडीवळे येथे उत्साहात

**लोणावळा, ता. ८ :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग व सुमन रमेश तुलसियानी टेक्निकल कॅम्पस, फॅकल्टी ऑफ इंजिनिअरिंग यांच्या संयुक्त विद्यमाने मावळातील वाडीवळे येथे राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) विशेष श्रमसंस्कार शिबिर पार पडले.

'शाश्वत विकासासाठी युवक, पाणलोट व पडीक जमीन व्यवस्थापन' या संकल्पनेवरील शिबिरात महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या २५ स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला. दरम्यान स्वयंसेवकांनी वाडीवळे, वळक आणि मुंढावरे या परिसरात रस्ते दुरुस्ती, कचरा व प्लॅस्टिक निर्मूलन, नदीकाठ आणि मंदिर परिसराची स्वच्छता केली. ग्रामस्थ व विद्यार्थ्यांसाठी विविध सांस्कृतिक आणि प्रबोधनात्मक उपक्रम राबवून सामाजिक संदेश दिला. संस्थेचे संस्थापक डॉ. सुबिरकुमार बॅनर्जी, अध्यक्ष गौरी भट्टाचार्य, सचिव डॉ. रितूपर्णा बॅनर्जी, खजिनदार श्रीजीत भट्टाचार्य, विश्वस्त डॉ. पार्थसारथी चौहान व सुवरा बॅनर्जी यांचे शिबिरासाठी मार्गदर्शन लाभले. प्राचार्य डॉ. जयवंत संकपाळ यांच्या नेतृत्वाखाली प्रा. दीपक अरुण पवार, प्रा. स्वागत गरूड, प्रा. अश्विनी भोसले, प्रा. समीक्षा जोंधळे रितेश भोकरे यांचे योगदान लाभले.

Pune, PCMC-Today
09/02/2026 Page No. 6